राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-४/कंत्राटीसेवा/बाह्ययंत्रणा/२०२१/ 450    दिनांक : 28 JAN 2021

**परिपत्रक :**

प्रति,

संचालक / प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,
सर्व प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था,
पुणे विभाग,

विषय : **बाह्य यंत्रणेद्वारे सुरक्षा रक्षक, सफाईगार व माळी पदाच्या सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत...**

संदर्भ :
(१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१०/८४/१०/विसु-१, दि. २७/०९/२०१०.
(२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दि. ०२/०२/२०१३.
(३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दि. ०२/१२/२०१३ व दि. १९/१२/२०१३.
(४) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि २०१६/प्र.क्र.२९/वित्तीय-१, दि. ०२/०८/२०१६.
(५) मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १५/तांशिस/अर्थसं/ २०१९-२०/१२, दिनांक १४/०५/२०१९
(६) या कार्यालयाचे पृष्ठांकन क्रमांक तंशिविकापु/आस्था-४/ कंत्राटीसेवा /२०१९/२१७८, दिनांक ३०/०५/२०१९.
(७) शासन पत्र क्र. संकिर्ण-१९१८/प्र.क्र.१२४/१८/माकशि-दिनांक १२ जानेवारी २०२१.
(८) मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १५/अर्थसं/कं.सेवा/ बाह्ययंत्रणा/२०२०-२१/१०, दिनांक १८/०१/२०२१.

उपरोक्त विषयान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था यांना कळविण्यात येते की बाह्य यंत्रणेद्वारे सुरक्षारक्षक, सफाईगार व माळी पदांच्या सेवा उपलब्ध करुन घेतांना संदर्भीय शासन निर्णय, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचकडील परिपत्रक व या कार्यालयाचे पृष्ठांकनाद्वारे दिलेल्या निर्देशानुसार कार्यपद्धतीचा अवलंब करण्याबाबत यापूर्वीच कळविले आहे.

तथापि शासन निर्देशानुसार दिलेल्या सुचनांचे काटेकोर पालन होणेसाठी संदर्भ क्र .८ च्या परिपत्रकान्वये पुनःश्च सुचना देण्यात आल्या असून संदर्भ क्र. ८ चे परिपत्रकाचे अवलोकन करण्यात यावे. **यापुढे बाह्य यंत्रणेमार्फत कोणत्याही सेवा घेतांना प्रशासकीय व वित्तीय पूर्वमान्यता शासनाची घेणे अनिवार्य राहील अन्यथा अशा पदांवरील वेतनाचा खर्च संबधीत संस्थांच्या प्राचार्यांकडून वसूल करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.**

**सोबत : वरीलप्रमाणे**

( डॉ. द. व्यं. जाधव ),
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत माहितीस्तव :
१) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सविनय सादर **(लक्षवेध कार्यासन क्र. १५)**

E:\EST 1\MyDocuments\Contract Basc.docx/255

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य ,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई – ४०० ००१.
दूरध्वनी क्र: ०२२-६८५९७४१५/४३५
ई-मेल : desk15@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

---

क्रमांक :-१५/अर्थसं/कं सेवा/बाहय यंत्रणा/ २०२०-२१/ 90 दिनांक:- 18-01-2021

परिपत्रक

प्रति,

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२. संचालक/ प्राचार्य , शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये
३. सर्व प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

विषय :- बाहय यंत्रणेद्वारे सुरक्षा रक्षक , सफाईगार व माळी इत्यादि पदांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबत

संदर्भ :-१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक पदनि-२०१०/८४/१०/विसु-१ , दिनांक २७/०९/२०१०
२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१ , दिनांक ०२/०२/२०१३
३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक पदनि-२०१३/ प्र.क्र./११२/१३ वित्तीय सुधारणा-१ , दिनांक २/१२/२०१३ व दिनांक १९/१२/२०१३
४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक पदनि-२०१६/ प्र.क्र.२९/१६/वित्तीय -१ , दिनांक ०२/०८/२०१६
५. संचालनालयाचे पत्र क्रमांक १५/तंशिसं/अर्थसं/२०१९-२०/१२ दिनांक १४ मे २०१९
६. शासन पत्र क्रमांक संकीर्ण — १९१८/प्र.क्र.१२४/१८/ माकश- दिनांक :- १२ जानेवारी २०२१

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 19 JAN 2021 आवक क्र. 403

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संचालनालयाने संदर्भिय क्रमांक ५ अन्वये बाहय यंत्रणेद्वारे कर्मचा-यांच्या सेवेबाबत वित्त् विभागाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यपदधतीचा अवलंब करण्याबाबत कळविले होते . शासनाने संदर्भ क्रमांक — ६ अन्वये संस्थांनी बाहय यंत्रणेद्वारे मंजुर पदापेक्षा जादा पदे कोणत्या नियमानुसार भरली आहेत. सदरहु पदे भरतांना वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांचा अवलंब केला काय , मंजूर पदापेक्षा अधिकची पदे भरण्याकरीता वरीष्ठ कार्यालयांची मान्यतेबाबत विचारणा केली आहे. सदर बाबतीत पुढील प्रमाणे पुनश्च: सुचना देण्यात येत आहेत.

१. वित्त विभागाचे शासन परिपत्रक संदर्भ क्रमांक १ ते ४ मधील तरतुदींचे तसेच या आदेशात वेळोवेळी केलेल्या सुधारणा / तरतुदीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२. संदर्भांकित वित्तविभागाच्या परिपत्रकातील सुचनांचे पालन न करता थेट पध्दतीने बाहय यंत्रणेच्या सेवा घेण्याकरीता शासनाने विहित केलेल्या निविदा प्रक्रियेद्वारे बाहय यंत्रणेच्या सेवा मंजूर रिक्त पदांच्या मर्यादेत उपलब्ध करुनच घ्याव्यात याबाबतीत शासनाची प्रशासकीय व वित्तीय आवश्यक ती मान्यता घेण्यात यावी.

३. आवश्यक काल्पनिक पदे मंजुरीसाठी संचालनालयातील कार्यासन क्रमांक १२- आस्थापना यांना प्रस्ताव सादर करुन उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा प्रशासनिक विभागाची/ शासनाची मंजुरी घेण्यात यावी .

४ . कार्यालय / संस्था यांच्या कडील वर्ग- ४ च्या मंजुर पदामधील रिक्त पदांकरीता वित्त विभागाकडून कंत्राटि सेवा करीता अनुदान मंजूर करण्यात येते त्यामुळे रिक्त पदांपेक्षा बाहय यंत्रणेमार्फत भरलेल्यां पदांची संख्या जादा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी .

४. नियमितपणे पदनिर्मिती करुन केलेल्या खर्चाच्या १० ते २५ टक्के बचत झालीच पाहीजे याची दक्षता कार्यालय/संस्थाप्रमुखांनी घ्यावी.

५. बाहय यंत्रणेच्या सेवेकरीता होणारा खर्च हा कमीत कमी प्रमाणात राहील याची जबाबदारी संबंधीत सहसंचालक/ संस्थाप्रमुंख यांची राहील .

६. सदरहु परिपत्रकातील सुचनांचे पालन न करणा-या संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

७. यापुढे बाहययंत्रणेमार्फत कोणत्याही सेवा घेतांना प्रशासकीय व वित्तीय पुर्वमान्यता शासनाची घेणे अनिवार्य राहील अन्यथा अशापदांवरील वेतनाचा खर्च संबंधीत संस्थांच्या प्राचार्यांकडून वसुल करण्यात येईल यांची नोंद घ्यावी .

(डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत : कार्यासन अधिकारी ,कार्यासन क्रमांक -१२ यांना कळविण्यात येते की, संचालनलयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालये , संस्थामधील बाहय यंत्रणेद्वारे सेवा बाबत नियंत्रण करण्यात यावे . यासंदर्भात आवश्यकती पुढील कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी.